# प्रकरण २ रे

# " गाभाभूत घटक - अर्थ, उद्दिष्टे व महत्त्व "

प्रकरण २ रे

## ' गाभाभूत घटक : अर्थ, उद्दिष्टे व महत्व'

२.१ प्रास्ताविक.

२.२ गाभाभूत घटक : अर्थ, उद्दिष्टे व महत्व.

अ) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.

ब) भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या.

क) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.

ड) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.

इ) समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता.

ई) स्त्री - पुरुष समानता.

उ) पर्यावरणाचे संरक्षण.

उ) सामाजिक अडसरांचे निर्मूलन.

ए) लहान कुटुंबाचा आदर्श.

ऐ) वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक .

२.३ राष्ट्रीय उद्दिष्टे व गाभाभूत घटक.

२.४ पाठ्यपुस्तके व गाभाभूत घटक.

२.५ समारोप.

## गाभाभूत घटक : अर्थ, उद्दिष्टे व महत्त्व

### २.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत शोध प्रबंधाचा विषय पुढील प्रमाणे आहे.

" प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे १० गाभाभूत घटकांच्या दृष्टीने केलेले मूल्यमापन."

या शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये आपण समस्येचे शब्दांकन, समस्येचे स्वरुप, महत्व , व्याप्ती, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनासाठी आवश्यक गृहितके, संशोधन पद्धती व या संशोधनाच्या मर्यादा या मुद्द्यविषयी चर्चा केलेली आहे. या चर्चेमधून संशोधन प्रबंधाचे स्पष्ट चित्र साकार होण्यास मदत होते.

या प्रकरणामध्ये आपण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य असलेल्या गाभाभूत घटकांच्या संदर्भात माहिती मिळविणार आहोत. प्रस्तुत संशोधन १० गाभाभूत घटकांच्या संदर्भात असल्यामुळे गाभाभूत घटक म्हणजे काय ? प्रत्येक गाभाभूत घटकाचा अर्थ, उद्दिष्टेव महत्व काय ? यांचे विवरण करणे अप्रस्तुत होणार नाही असे वाटते. सबब प्रस्तुत प्रकरणात १० गाभाभूत घटकांचे अर्थ, उद्दिष्ट व महत्त्व या मुद्द्यांच्या संदर्भात ऊहापोह करण्यात आलेला आहे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे, हे लक्षात घेऊन अनेक शिक्षण तज्ञांनी आपले शिक्षणविषयक विचार मांडले. भारतासारख्या भिन्नधर्मी, भिन्नपंथी, बहुभाषी अशा खंडप्राय देशात 'राष्ट्रीय एकात्मते' ची नितांत गरज लक्षात घेऊन केंद्रशासनाने एक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केले. या राष्ट्रीय शैक्षणिक

धोरणाच्या अनेक महत्वाच्या वैशिष्टांपैकी '१० गाभाभूत घटक ' हे एक सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. कारण गाभाभूत घटकांची ही संकल्पना संपूर्णपणे नवीन आहे. भारतातील सर्व राज्यांच्या समान गरजा लक्षात घेऊन आणि भारताची एकात्मता जोपासण्याच्या दृष्टीकोनातून जे घटक प्राथमिक शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत करणे आवश्यक आहेत त्या घटकास ' गाभाभूत घटक ' असे नामाभिधान देण्यात आले आहे.

'गाभा' या शब्दाचा अर्थ आपण व्यवहारामध्ये गर्भ, सार, सत्त्व, मूळ असा लावतो. शब्दकोशामध्ये 'गाभा' या शब्दाचा अर्थ 'गर्भ' 'मध्य' असा दिलेला आहे.

थोडक्यात शालेय अभ्यासक्रमातील 'गाभाभूत घटकांची संकल्पना 'विविधतेत एकात्मता' (Unity in Diversaty) जपण्याच्या गरजेतून निर्माण झाली आहे .

गाभाभूत घटक म्हणजे नव्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेला एक स्वतंत्र विषय नव्हे. हे गाभाभूत घटक अभ्यासक्रमात सर्वत्र आढळून येतात. ते अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांत, विविध विषयांच्या आशयात, पाठ्यपुस्तकात, शिक्षकांच्या अध्यापनात, विद्यार्थ्यांच्या अध्ययनात आढळतात. कुशल शिक्षक समवाय पद्धतीने अगदी सहजपणे हे गाभाभूत घटक विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवू शकेल.

## २.२ गाभाभूत घटक - अर्थ, उद्दिष्टे व महत्व :

राष्ट्रीय अभ्यासक्रमातील हे १० गाभाभूत घटक खालील प्रमाणे.

१. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.
History of Freedom Movement.

२. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या .
Constitutional obligations.

३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.
Content Essential to Nurture National Idaility.

४. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.
India's common Cultural Heritage.

५. समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता.
Egalitarianism Democrcy and Secularism.

६. स्त्री-पुरुष समानता.
Equality of Sexes.

७. पर्यावरणाचे संरक्षण.
Protection of Environment.

८. सामाजिक अडसरांचे निर्मूलन.
Removal of Social Barriers.

९. लहान कुटुंबाचा आदर्श.
Observance of the Small Family Norms.

१०. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक.
Incculcation of the Scientific temper.

वर निर्देशित केलेल्या दहा गाभाभूत घटकांचा अर्थ, उद्दिष्टे व महत्त्व यांचा ऊहापोह पुढील परिच्छेदातून केलेला आहे.

अ. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीची फलनिष्पत्ती म्हणून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारत हा धर्मनिरपेक्ष व प्रजासत्ताक देश बनावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली होती.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीने इंग्रजांना भारतातून सत्ताभ्रष्ट केले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची प्रेरणा म्हणजे गुलामगिरीची चीड होती. हा स्वातंत्र्य संग्राम म्हणजे या गुलामगिरीच्या जाणिवेच्या विकासाचा इतिहास आहे. त्याचप्रमाणे या स्वातंत्र्यचळवळीचा लढा हा लोकशाहीच्या विकासाचा लढा आहे. विधायक राष्ट्रनिर्मितीचा लढा आहे. या लढ्यामध्ये सर्व प्रांतातील अनेक देशभक्तांनी भाग घेतला, त्याग केला व प्रसंगी देशासाठी बलिदानही केले.

या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, विश्वबंधुत्त्व, विश्वशांती इत्यादी मूल्ये विकसित झाली म्हणूनच 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास ' हा गाभाभूत घटक राष्ट्रीय अभ्यासक्रमात समाविष्ट केलेला आहे.

प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय स्वातंत्र्य लढ्याविषयी माहिती देणे.

२. प्रस्तुत स्वातंत्र्य लढ्यातून कोणती मूल्ये विकसित झाली हे समजावून सांगणे.

३. हा स्वातंत्र समग्राम केवळ राजकीय नव्हता तर सामाजिक, अर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक होता हे समजावून देणे.

४. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी स्वातंत्र्य संग्रामासाठी कोणता त्याग केला, हे स्पष्ट करणे. तसेच त्या सर्व व्यक्तिविषयी आदरभाव निर्माण करणे.

५. राष्ट्राबद्दल व स्वातंत्र्याबद्दल प्रेम निर्माण करणे.

६. देशाविषयी अभिमान, प्रेम विकसित करणे.

७. भारताला स्वातंत्र्य सुखासुखी मिळालेले नाही त्यासाठी अनेकांना बलिदान करावे लागले. त्याहुतात्म्यांच्या विषयी आदराची भावना निर्माण करणे.

८. देशासाठी असीम त्यागाची भावना निर्माण करणे.

या गाभाघटकामुळे समकालीन भारताची परिस्थिती कळण्यास व भारताच्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेशी मूलभूत असलेली मूल्ये व कल्पना समजण्यास सुकरता येणार आहे.

स्वातंत्र्यसंग्राम याचा अर्थ केवळ 'परदास्यविमोचन - संग्राम' असा नसून राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक इत्यादी सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्ती मिळविण्याचा संग्राम असा आहे. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामामुळे भारतीयांच्या समाज जीवनाचा कायापालट झाला. सत्य, आहिंसा, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित समाज - जीवन निर्माण करण्याचा भारतीयांनी निर्धार केला. कारण इंग्रज येथून गेल्यानंतरही या मूलभूत मानवी मूल्यांसाठी स्वातंत्र्यसमर चालूच राहणार होते. स्वातंत्र्याधिष्टीत नवसमाज निर्मिती, नवी वैश्विक मूल्ये , शांतता व सद्भाव हा भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा खरा अर्थ आहे. आणि म्हणूनच ते एक मूलगामी असे शैक्षणिक गाभा मूल्यही आहे.

ब : भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या

समाजामध्ये अनेक सामाजिक संस्था असतात. कोणतीही सामाजिक संस्था नियमाशिवाय सुरळीत काम करु शकत नाही 'राज्यसंस्था' ही अत्यंत महत्वाची सामाजिक संस्था आहे. तिचेही विशिष्ट नियम आहेत. या नियमानाच 'राज्यघटना' किंवा 'संविधान' असे म्हणतात.

संविधान हा राज्याचा मूलभूत कायदा आहे. हा मूलभूत कायदा देशाच्या शासनपद्धतीचे स्वरुप स्पष्ट करतो, त्यांची काम करण्याची पद्धती निश्चित करतो शासन व व्यक्तिचे अधिकार निश्चित करतो व परस्परांतील संबध निश्चित करतो.

भारतीय संविधानात भारताच्या भावी शासनाने कोणत्या स्वरुपाचे कायदे करावेत हे मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरुपात स्पष्ट केलेले आहे. नागरिकांची कर्तव्ये संविधानाने भारतीय नागरिकावर टाकलेली बंधने आहेत. याशिवाय भारतीय संविधानाने नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर बंधने घातलेली आहेत.

थोडक्यात "मूलभूत कर्तव्ये" नागरिकांच्या वरील बंधने आहेत. "मार्गदर्शक तत्त्वे" शासनावरील संविधानात्मक बंधने आहेत. "मूलभूत अधिकारावरील" विवेकी बंधने ही नागरिकावरील बंधने आहेत. तर नागरिकांच्या विरुद्ध कायदे करता कामा नयेत हे संविधानाने शासनावर टाकलेले कायदेशीर बंधन आहे.

देशाच्या अपेक्षा आणि जाणीवा राज्यघटनेत प्रतिबिंबित होतात. त्याच प्रमाणे शालेय अभ्यासक्रमातून त्या देशाच्या अपेक्षा व जाणिवा प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत. घटनेत जी मूल्ये नमूद करण्यात आलेली आहेत त्यानुसर मुक्त समाजाची आणि लोकशाही, समाजवादी आणि धर्मातीत राज्याची उभारणी अभिप्रेत आहे.

प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय संविधानाची थोडक्यात माहिती देणे.

२. भारतीय संविधानात्मक जबाबदऱ्या समजावून सांगणे.

३. संविधानात्मक जबाबदाऱ्या विषयीची जाणीव विद्यार्थीच्या मनात निर्माण करणे.

४. नागरीकांची मूलभूत कर्तव्ये या बद्दलची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.

५. शासनावरील घटनात्मक बंधने कोणती हे विद्यार्थ्यींना समजावून देणे.

६. नागरिकावरील घटनात्मक बंधने कोणती हे विद्यार्थ्यांना समजावून देणे.

७. विद्यार्थ्यांत भारतीयत्त्वाची जाणीव निर्माण करणे.

या गाभाघटकामध्ये अंतर्भूत होणारा आशय व वरील उद्दिष्टे अभ्यासक्रमातील विविध विषय व विविध विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. हे प्रथम शिक्षकांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यानुसार शिक्षकांना विविध उपक्रमांचे आयोजन व त्यांचे नियोजन करता येईल. सुजान नागरिक निर्मितीच्या दृष्टीकोनातून या गाभा घटकाचा विचार अत्यंत फलदायी व महत्त्वाचा ठरु शकेल. अभ्यासक्रमाची प्रभावी अमंलबजावनी करीत असताना या गाभाघटकाचा विचार होणे आवश्यक आहे. खेळ, सहली, चर्चा व वादविवाद, सहभोजन, महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या यासारख्या उपक्रमातून हे गाभामूल्य प्रतिबिंबित होऊ शकेल. या गाभा घटकाचे महत्त्व लक्षात घेऊनच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार हा गाभाभूत घटक अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

क. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय.

राष्ट्रीय शिक्षणपद्धतीत एकात्मतेच्या भावनेला चालना देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक्रमात "राष्ट्रीय आस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय " या गाभाभूत घटकाचा समावेश केलेलला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या विभिन्नता असणाऱ्या आपल्या देशात राष्ट्रीय ऐक्य भावनेची नितांत गरज आहे. शिक्षणामधून वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन द्यावयास हवे. अशा मूल्यात्मक शिक्षणाने धर्मांधता, हिंसाचार, अंधश्रद्धा आणि दैववाद कमी होईल. या गाभामूल्य संस्कारामधून वैयक्तिक स्वार्थ नाहीसा होऊन राष्ट्रहीत, समाजहीत महत्वाचे ठरु शकेल.

भारत हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे. जगातील सर्व स्वतंत्र राष्ट्रांना स्वत:चा ध्वज, स्वत:चे राष्ट्रगीत व स्वत:ची राजमुद्रा असते. त्याचप्रमाणे भारताचीसुद्धा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राजमुद्रा ही तीन प्रतिके आहेत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय प्रतिकांचे महत्व अनन्यसाधारण आहे. भौगोलिक दृष्टीने व प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने भारत हा वैशिष्ट्य पूर्ण देश आहे. आकार, हवामान, वनस्पती, मानवी जीवन व भूरचना या बाबतीत भारतात खूपच विविधता आढळते. हिमालयाची प्रचंड संरक्षक भिंत उत्तर सीमेवर उभी आहे गंगा, ब्रह्मपूत्रा,नर्मदा, कावेरी या नद्यांनी आपल्या भारत देशाला सुजलाम् सुफलाम् बनवले आहे. या साऱ्या गोष्टी अभिमानास्पद आहेत.

प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. राष्ट्रीय अस्मिता वाढीस लावणे.

२. विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम व एकात्मता जागृत करणे व ते वाढीस लावणे.

३. राष्ट्रीय प्रतिकाबद्दल जाणीव व पूज्यभाव निर्माण करणे.

४. विद्यार्थ्यांत लोकशाहीबद्दल प्रेम निर्माण करणे.

५. राष्ट्रीय सणांचे महत्व शिद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.

६. निसर्गाबद्दल प्रेम निर्माण करणे, निसर्गसौंदर्याचे रसग्रहण करणे.

७. भारतातील नद्या, पर्वत, जमीन व भौगोलिक रचना समजावून सांगणे.

८. भारताला सुजलाम्, सुफलाम् भूमी का म्हणतात ते सांगणे.

९. ऐतिहासिक स्थळे, प्राचीन शिल्पे, तीर्थस्थळे इत्यादी विषयांचा इतिहास सांगून त्याविषयी अभिमान निर्माण करणे.

या गाभा घटकाची व्याप्ती खूपच मोठी आहे. त्यामध्ये खालील उपघटकांचा समावेश होतो.

१. आपली राष्ट्रीय प्रतिके : राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राजमुद्रा.

२. राष्ट्रीय सण : स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन.

३. राष्ट्रीय फूल, पक्षी व प्राणी.

४. भारतातील नद्या, पर्वत व जमीन.

५. भारतातील वास्तूशिल्प : ताजमहाल, अजिंठा - वेरुळ येथील लेणी, स्तूप, स्तंभ, नृत्य व संगीत.

६. आधुनिक वैज्ञानिक तिर्थस्थाने : भाक्रा नानगल धरण, जायकवाडी धरण, भाभा अनुसंशोधन क्रेंद्र, उपग्रह इत्यादी.

या गाभाघटकामधून आपल्या देशाने ऐतिहासिक काळात प्रगतीची कोणती उंची गाठली होती व सध्या आपण किती प्रगती केली आहे. याची योग्य कल्पना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकेल. राष्ट्रीय प्रतिकाविषयी आदर व पूज्यभाव वाढीस लागेल. राष्ट्रातील प्रत्येक चांगल्या गोष्टी विषयी अभिमान

वाटू लागेल. या गाभा घटकामुळे विद्यार्थी राष्ट्राचे सच्चे नागरिक बनतील. राष्ट्राच्या प्रेमाची ज्योत त्यांच्या अंतरात्म्यात अखंडपणे तेवत राहील.

ड भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.

संस्कृती ही सर्वव्यापक अशी संज्ञा आहे. समाजाने प्राचीन काळापासून आजतागायत प्राप्त केलेले ज्ञान - विज्ञान, विकसित केलेली विचारसंपदा, निर्माण केलेले धर्म, उपासना, पंथ, विविध प्रकारच्या भाषा व त्यातील साहित्य, विविध प्रकारच्या कला, संगीत, नृत्य, शिल्प इत्यादी त्याचप्रमाणे समाजासमोर ठेवलेले आदर्श, धारण केलेली मूल्ये, सामाजिक परंपरा व चालिरिती, अनुसरलेली जीवनपद्धती या सर्वबाबींचा संस्कृती या संज्ञेत अंतर्भाव होतो.

भारत हा खंडप्राय देश असल्याने भारतात भौगोलिक विविधतेबरोबरच सांस्कृतिक विविधताही फार मोठ्या प्रमाणावर दिसते. भारतात अनेक धर्म अनेक पंथ, अनेक विचार संप्रदाय व अनेक भाषा प्रचलित आहेत. त्यानुसार अनेक प्रादेशिक संस्कृती विकसित झाल्या आहेत. ही सांस्कृतिक विविधता जरी आढळत असली तरी तिच्यातील एकात्मतेचे, राष्ट्रीयत्वाचे, संपूर्ण भारतीयत्त्वाचे दर्शन घडविते.

संस्कृती हा शब्द संस्कार या शब्दापासून आला असल्यामुळे संस्कृती म्हणजे गुणांची स्थापना व दोषांचे अपनयन असा अर्थ घेतला जातो. संस्कृतिचे स्पष्टीकरण आचार्य विनोबा भावे यांनी 'सतकृत्यांची परंपरा' या शब्दात केले आहे. समाजाने जी अध्यात्मिक, बौद्धिक, वैचारिक व भौतिक प्रगती केली असेल त्यानुसार त्या समाजाच्या संस्कृतिचे दर्शन घडत असते.

भारतीय संस्कृतीमध्ये तत्वज्ञान, भाषा व साहित्य, संत परंपरा, आदरणीय ग्रंथ, धार्मिक सामाजिक व राजकीय सुधारणांची चरित्रे, सण आणि उत्सव, भारतीय वैज्ञानिक परंपरा व वारसा व ललित कला या गोष्टींचा समावेश होतो.

प्रस्तुत गाभाघटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. भारतीय संस्कृतीची स्पष्ट कल्पना देणे.

२. प्राचीन भारतीय संस्कृती किती समृद्ध होती याची जाणीव करुन देणे.

३. भारताच्या विविध प्रदेशामध्ये विविध प्रकारच्या सांस्कृतिक परंपरा जरी विकसित होत गेल्या तरी त्यात विरोध किंवा विसंवाद नसून त्यात एकात्मता कशी आहे याचे आकलन होण्यास मदत करणे.

४. भारतीय संस्कृतिचे यथार्थ दर्शन घडवून तिच्यासंबधी आदर व अभिमानाची भावना निर्माण व्हावी, असा प्रयत्न करणे.

५. भारतीय संस्कृतीने जागतिक संस्कृतीमध्ये काही योगदान दिलेले आहे. हे लक्षात आणून देणे.

६. भारतीय संस्कृतीचा हा समृद्ध वारसा जपण्याची व वर्धिष्णू होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची प्रेरणा देणे.

सामाजिक प्रगती व सामाजिक परिवर्तन या ध्येयाबरोबरच संस्कृति-संक्रमण किंवा सांस्कृतिक परंपरांचा स्वीकार हे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. कोठारी आयोगाने देखील राष्ट्रीय प्रगतीसाठी आधुनिकीकरण या उद्दिष्टा बरोबरच आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे प्रवर्तन या उद्दिष्टाचे राष्ट्रीय शैक्षणिक उद्दिष्ट म्हणून प्रतिपादन केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) मध्येही

मूल्याधिष्टित शिक्षणासाठी आपल्या सांस्कृतिक वारशांचा आधार घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

भारतात अनेक धर्म, पंथ, भाषा, संप्रदाय, आढळतात. या साऱ्यांमध्ये खूपच विविधता आढळते. प्रत्येक धर्म, प्रत्येक भाषा, प्रत्येक जाती इत्यादी परत्वे समाजात अनेक गट निर्माण झाले आहेत. गटनिहाय अनेक प्रादेशिक संस्कृती विकसित झाल्या आहेत. प्रत्येक गट आपापल्या संस्कृतीची जोपासना करीत आहे. परिणामत: यातून विघटनात्मक प्रवृत्ती बळावत आहे. त्यामुळे भारताचे सांस्कृतिक विघटन होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. यावर उपाय म्हणून भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा जोपसणे आवश्यक आहे. भारतीय प्राचीन संस्कृतीतील एकात्मतेचे, राष्ट्रीयत्वाचे दर्शन शिक्षणामधून होऊ शकेल याच दृष्टीने राष्ट्रीय अभ्यासक्रमात 'भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा' हा गाभा घटक अंतर्भूत करण्यात आला आहे.

या घटकाचे महत्वाचे प्रयोजन म्हणजे प्राचीन भारतीय संस्कृतीमधून 'विविधतेतून एकात्मता ' कशी साधली गेलेली होती हे शिक्षणामधून विद्यार्थ्यांना दाखवून द्यावयाचे आहे. यामधून सामंजस्य, प्रेमभाव, जिव्हाळा निर्माण होऊन एकात्मता वाढीस लागेल.

## इ. समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण लोकशाही विचारप्रणाली स्वीकारली आणि खऱ्या अर्थाने प्रजातंत्र प्रस्थापित करण्याचा संकल्प बांधला. भारतीय जनतेला विविध क्षेत्रात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळवून देणे हे उद्दिष्ट होते. किंबहुना भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे हे एक प्रमुख उद्दिष्ट होते.

परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वाढत चाललेली आर्थिक विषमता, खेड्यातील जनता व शेतकरी यांच्याकडे झालेले दुर्लक्ष, आतंकवाद, संकुचित धार्मिक व प्रादेशिक भावना इत्यादी कारणामुळे जनतेच्या मनात कमालीची निराशा व अस्थिरता निर्माण झालेली आहे. जातीयतेच्या भावनेमुळे लोकांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. आज पुन्हा एकदा स्वातंत्र्यलढ्यासारखा व्यापक असा राष्ट्रीय एकात्मतेचा लढा देण्याची काळाची गरज निर्माण झालेली आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरता देशातील, प्रांतातील विविध धर्मांच्या, भाषेच्या आणि संस्कृतीच्या लोकांना पुन्हा एकदा संघटित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या खऱ्या प्रेरणा, लिखित संविधानाद्वारे आपण स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील समानता आणि न्याय प्रजातंत्र, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्ये प्रत्यक्षात प्रस्थापित करण्यसाठी सर्वप्रथम समानता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्ये या संकल्पनांची आणि विचारांची वैश्विक मान्यता काय आहे, त्यांचा खरा अर्थ काय आहे हे शिक्षण प्रक्रियेमधून विद्यार्थी समजून घेऊ शकतील. म्हणूनच राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमात हे गाभा मूल्य समाविष्ट करण्यात आलेले आहे.

**प्रस्तुत गाभाभूत घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.**

१. समानतावादाचा अर्थ सांगणे.

२. राज्यघटनेच्या संदर्भात कोणत्या प्रकारची समानता सार्वजनिक जीवनात अपेक्षित आहे ते स्पष्ट करणे.

३. लोकशाही म्हणजे काय ? लोकशाहीचे प्रकार कोणते ? इत्यादी संबधी माहीती देणे.

४. लोकशाही यशस्वी होण्यासाठी काय केले पाहिजे ते स्पष्ट करणे.

५. धर्मनिरपेक्षतेची संकल्पना स्पष्ट करणे.

६. राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेसंबधी कोणत्या तरतुदी आहेत, नागरिक म्हणून आपल्या वर्तनात कोणते बदल झाले पाहिजेत तसेच या संदर्भात राजकीय पक्ष, शासन इ. कडून कोणती कर्तव्ये अपेक्षित आहेत, ते सांगणे.

७. राज्यघटनेत वर उल्लेख केलेली तीन मूल्ये समानतावाद, लोकशाही, व धर्मनिरपेक्षता याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास व प्रेम निर्माण करणे.

घटनेत जी मूल्ये नमूद करण्यात आली आहेत, त्यानुसार मुक्त समाजाची आणि लोकशाही समाजवादी आणि धर्मातीत राज्याची उभारणी अभिप्रेत आहे. त्यामुळे 'समानतावाद, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता ' या गाभा घटकांचा पुनर्रचित अभ्यासक्रमात समावेश केला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्यातही (१९८५) शिफारस केलेली आहे.

सामाजिक बदल घडवण्यासाठी शिक्षण हे उत्तम साधन असल्याने समान संधीचे तत्त्व जोपासण्याच्या दृष्टीने शिक्षणपद्धती आणि अभ्यासक्रमाची रचना असणे आवश्यक आहे. निरनिराळी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिक्षणात संधी मिळणे जरुरीचे आहे. समतेचा संबोध गेल्या दशकात घातलेल्या शिक्षणाच्या विस्तृत पायाने पक्का केला पाहिजे. पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या खास गरजा ध्यानात घेऊन शिक्षणक्रमाची आखणी होणे जरुर आहे. ही पिढी पुढील मोठ्या कालावधीत समाजाचा प्रमुख घटक होईल. उपेक्षित व कमकुवत घटकांसाठी खास शिक्षण पद्धतीचा अवलंब करुन त्यांना थोड्या कालावधीत मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणून सोडणे शक्य होईल.

लिंगभेदानुसार शिक्षणात कोणतीही तफावत न ठेवता मुले आणि मुली यांना एकाच पातळीवर आणणे जरुर आहे.

लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता ही मूल्येसुध्दा महत्त्वाची आहेत. म्हणूनच या तीनही मूल्यांचा पुनर्रचीत अभ्यासक्रमात समावेश केला आहे. तसेच गाभा घटकाच्या यादीत प्रस्तुत घटकांचा अंतर्भाव केलेला आहे.

## ई. स्त्री - पुरुष समानता

स्त्री - पुरुष असमानता ही भारतीय समाजापुढील खूप मोठी समस्या आहे. सद्या भारतीय स्त्री - पुरुष यांचे गुणोत्तर काय आहे, त्याची कारणे काय आहेत, भारतीय राज्यघटनेत स्त्रियांचे स्थान काय आहे, स्त्री व पुरुष यांची शारीरिक क्षमता, स्त्रियांना दुय्यम लेखले जाण्याची कारणे इत्यादी मुद्द्यासंबधीची माहिती प्रस्तुत गाभा घटकात समाविष्ट होवू शकते.

जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने व्यक्तिमत्व विकासाची समान संधी म्हणजे 'स्त्री - पुरुष' समानता. पुरुषांच्या सुखदु:खा प्रमाणे स्त्रीलाही तिची सुखदु:खे आहेत ही सामंजस्याची जाणीव स्त्री - पुरुषात सजग ठेवणे याचेच नाव 'स्त्री - पुरुष समानता'.

स्त्री पुरूष हे समान दर्जाचे आहेत. त्यामुळे स्त्री पुरुष यांच्यात श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेद करता कामा नये. जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यांना समान वागणूक, समान संधी, समान हक्क आणि अधिकार मिळणे असा या गाभामूल्याचा आशय आहे.

भारताच्या राज्यघटनेत १४ व्या अनुच्छेदानुसार भारतीय नागरिक कायद्यासमोर समान आहेत. संविधानाने भारतीय स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे. समाजाच्या आकृतिबंधात स्त्री - पुरुषांचे स्थान बरोबरीचे

असते. त्यामुळेच सर्व व्याक्तिंमुळे समाजाचा विकास होतो. ही नवी जाणीव 'स्त्री - पुरुष समानता' या गाभाभूत घटकातून होऊ शकते.

प्रस्तुत गाभाभूत घटकाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. गृहव्यवस्थापनात कुटुंबातील सर्व सदस्यांची सामाजिक जबाबदारी असते. हा मुद्दा विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.
२. परंपरेने चालत आलेल्या स्त्री व मुलगी यांची परावलंबित्त्वाची प्रतिमा पुसून टाकण्यास सहाय्य करणे.
३. स्त्रीयांचे हक्क व स्त्रीयांच्या क्षमता या बाबत विद्यार्थांच्या मनात जागृती निर्माण करणे.
४. विवाहप्रसंगी स्त्री - पुरुष भेदभाव दर्शविणाऱ्या हुंडा, वधू - किंमत (दहेज) यासारख्या समाजविघातक प्रथांविरुद्ध चीड उत्पन्न करणे.
५. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुषांस समान मूलभूत अधिकार दिले आहेत हे समजावून देणे.
६. स्त्रीहितासाठी शासनाने कायदे केले आहेत त्याची माहिती करुन देणे ( उदा. १९६१ चा हुंडाबंदी कायदा)
७. प्रशासन, व्यवस्थापन नेतृत्व या बाबत कर्तबगारी दाखविलेल्या स्त्रीयांची माहिती करुन देणे.
८. स्त्रीयांचा दर्जा सुधारण्याचा ज्यांनी प्रयत्न केला अशा व्यक्ती वं संस्थांची माहिती करुन देणे. ( जसे महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई, एस्.एन्.डी.टी. विध्यापीठ, इत्यादी.)

पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव प्रबळ रुढी, परंपरा आणि त्या मोडण्याविषयी उदासिनता यामुळे भारतीय समाजात स्त्रीयांचा दर्जा दुय्यम

राहिला आहे. धार्मिक आणि रुढी परंपरांच्या नावावर स्त्रियांना विकासाच्या संधी नाकारल्या गेल्या त्यामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा दर्जा खालावलेला दिसून योतो. निरक्षरता, अज्ञान यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाकडे दुर्लक्ष झाले. हेच भारतीय समाजाचे स्वरुप बदलण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. म्हणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ठरविलेल्या अभ्यासक्रमामध्ये स्त्री - पुरुष समानता या गाभा घटकाचा समावेश केलेला आहे.

या गाभामूल्याच्या संस्कारामुळे समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा नाहीशी होऊन स्त्री - पुरुष समानतेचे मूल्य रुजविणे शक्य होवू शकेल. स्त्री आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि समर्थ बनेल. स्त्रीयांचे हक्क व स्त्रीयांची क्षमता याबाबत समाज जागरुक राहिल. भारतीय संस्कृतीत स्त्री - पुरष यांचे तात्विक व व्यावहारिक स्थान समतुल्य मानले गेले आहे. स्त्रीत्त्व व पुरुषत्त्व ही परस्पर विरोधी नसून परस्पर पुरक आहेत याची जाणीव निर्माण होऊ शकेल.

संविधानातील तरतुदीप्रमाणे हिंदुकोड, हिंदूवारसा कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, समान वेतन कायदा हे स्त्री हितासाठी असलेले कायदे अनुकरणात येऊ शकतील कायद्याला लोकशिक्षणाची साथ हवी यामुळे स्त्री - पुरुष यांच्यात केवळ बरोबरीची स्पर्धा निर्माण न होता त्यांना सर्वांगीण विकासाची संधी मिळू शकेल.

व्यक्ती, कुंटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी आणि निकोप विचारसणीसाठी स्त्री - पुरुष समानता हे मूल्य अत्यावश्यक आहे.

उ : पर्यावरणाचे संरक्षण

माणसाच्या भोवतालची परिस्थिती म्हणजे परिसर किंवा पर्यावरण. माणूस व्यक्तिश: आणि समूहश: परिसराशी क्रिया - प्रतिक्रियांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबधित असतो. माणसाचा परिसर दोन प्रकारचा असतो. प्राणी, झाडे, नद्या, डोंगर, जमीन, हवा, पाणी, या गोष्टी निसर्गाने निर्माण केल्या आहेत. त्यांना 'नैसर्गिक परिसर' म्हणतात. माणूस स्वत: या नैसर्गिक परिसराचा एक घटक आहे.

दुसऱ्या प्रकारच्या परिसरामध्ये अवजारे, यंत्रे. हत्यारे, साहित्य, विज्ञान यांचा समावेश होतो. या सर्व गोष्टी मानव निर्मित असतात. त्यांना सामाजिक परिसर असे म्हणतात. त्यांनाच सांस्कृतिक पर्यावरण असेही म्हणतात माणसाचे जीवन या दोन्ही प्रकारच्या पर्यावरणावर अवलंबून असते. पर्यावरणाचे स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि वैश्विक असे स्तर असतात शिवाय पर्यावरणाचे घटक आणि प्रक्रिया या दोहोंचा समावेश होतो. प्रस्तुत गाभा घटकामधून पर्यावरणासंबधी माहिती व पर्यावरण संरक्षणाची आवश्यकता स्पष्ट होते.

प्रस्तुत गाभा घटकामध्ये नैसर्गिक पर्यावरण, मानवी प्रगती व या प्रगतीचे बळी, नवे प्रश्न, नवीन जीवनपद्धती, जमिनीचा दुरुपयोग, हवेचे प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण, अनुशक्तीचा धोका, प्राणी जीवनाचा ऱ्हास या सर्व मुद्द्यांचा समावेश होतो.

वाढत्या लोकसंख्यमुळे शहरे वाढली, झोपडपट्ट्या वाढल्या, कारखाने वाढले त्यामुळे हवा, पाणी, जमीन, अवकाश आणि पर्यावरणाचे

अनेक घटक दुषित झाले यालाच 'पर्यावरणाचे प्रदूषण' असे म्हणतात. गिरण्या, कारखाने आणि मोटारगाड्या यातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे हवा दुषित होत आहे.

पाणी हे जीवन आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे व कारखानदारीमुळे प्रचंड प्रमाणात घाणीचे ढीग पाण्यात सोडले जात आहेत. शहरातील सांडपाणी व मैला नद्यांमध्ये सोडले जाते. विविध प्रकारचे कारखाने हे नद्यांच्या काठी स्थापन होतात. साखर कारखाने, कागद कारखाने, कापड कारखाने, जंतुनाशके व खत कारखाने यामधील टाकावू पदार्थ हे नद्या, समुद्रामध्ये सोडले जातात त्यामुळे जल प्रदुषनाची समस्या निर्माण झालेली आहे.

अशाप्रकारचे पर्यावरण प्रदुषण थांबविणे ही अत्यंत आवश्यक बाब बनलेली आहे. पर्यावरण प्रदुषण ही खूप मोठी समस्या भेडसावत आहे. अभ्यासक्रमातील प्रस्तुत गाभा मूल्य यादृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. परिसराच्या संरक्षण विषयाची जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करणे.
२. 'पर्यावरण संरक्षण' हा प्रश्न केवळ आपल्या देशापुरताच संबधीत नसून संपूर्ण जगाशी संबधित आहे हे स्पष्ट करणे.
३. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.
४. पर्यावरण संवर्धनाची व संरक्षणाची माहिती करुन देणे.
५. ध्वनिप्रदूषण व वायुप्रदुषण यांच्या दुष्परिणांमाची जाणीव करुन देणे.
६. अभयारण्ये, पक्षी - अभयारण्ये व राखीव जंगले येथील परिसराची निरीक्षणास संधी उपलब्ध करुन देणे.

७. दुषित हवेमुळे होणाऱ्या रोगांची माहिती देणे.

८ पर्यावरण विषयक प्रदर्शनाना भेटी देण्यास प्रवृत्त करणे.

माणसाने वैज्ञानिक प्रगती केली. परिसरामध्ये खूप मोठ्याप्रमाणावर बदल घडवून आणले परंतु हे सारे करीत असताना पर्यावरणाच्या समतोलाचा विचार केला नाही. त्याचा परिणाम आज पर्यावरण प्रदुषण समस्या निर्माण झाली. प्रस्तुत गाभा घटकामुळे पर्यावरण संवर्धन व संरक्षणाची जाणीव निर्माण होवू शकेल. समाजामध्ये जंगलांचे उपयोग व जंगलतोडीचे दुष्परिणाम या विषयी जाणीव जागृती निर्माण होईल. त्याचप्रमाणे जलप्रदुषण व वायुप्रदुषणावरील उपाययोजनांची काटेकोरपणे अमंलबजावणी केली जाऊ शकेल. अशाप्रकारे या गाभा मूल्याचा अभ्यासक्रमातील समावेश अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे.

## ऊ : सामाजिक अडसरांचे निर्मूलन

व्यक्तींची मने जोडणारी प्रक्रिया म्हणजे एकात्मता होय. व्यक्ती जेंव्हा इतरांच्या सुखदु:खाशी समरस होतात तेंव्हा त्याला राष्ट्र-स्वरुप प्राप्त होते व्यक्तीचे वर्तन, कला, वांङमय, रुढी, परंपरा इत्यादीतून समाजाच्या एकात्म संस्कृतीचे दर्शन घडते. सामुदायिक संस्कृतीची कल्पना ही राष्ट्रीय एकात्मतेचा पाया आहे. अशा एकात्मतेतच राष्ट्रचे सामर्थ्य असते.

भारतीय समाजामध्ये या एकसंघ, एकजिनसी, एकात्म समाजाच्या निर्मितीत काही अडथळे दिसून येत आहेत. जातिप्रथा, अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, स्त्री-पुरूष भेदभाव, व्सनाधिनता, गरीबी, अशिक्षित लोक, भिन्न धर्मीय, भाषिक, पंथीय भेद अशा अनेक प्रकारचे सामाजिक अडसर निर्माण

झालेले आहेत. वरील सर्व भेद हे समाजाच्या एकात्मतेला, प्रगतीला, विकासाला घातक आहेत. म्हणून या सामजिक अडसरांचे निर्मूलन होणे गरजेचे आहे.

यासाठी घरी-दारी होणारे जातिभेदाचे संस्कार पुसून टाकणे गरजेचे आहे. भिन्न भिन्न धर्मियात द्वेषाची ठिणगी निर्माण झालेली आहे. ती नाहीशी करुन एकात्मतेच्या भावनेची जोपासना करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शिक्षण माध्यमाद्वारे प्रयत्न व्हायला पाहिजेत.

प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. 'मानवता माझा धर्म ' व 'भारतीय माझी जात' या उद्दिष्टांप्रत विद्यार्थ्यांना घेऊन जाणे.
२. सर्व धर्माबद्दल आदराची भावना निर्माण करणे.
३. सर्व धर्माच्या तत्त्वांचे सार एकच - 'मानवतेवर प्रेम करा' या भावनेची जोपासना करणे.
४. 'अस्पृश्यता हा सर्वात माठा सामाजिक अडसर असून तो दूर करण्याची तातडीची गरज आहे' याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देणे.
५. स्त्री-पुरूष दोघेही सर्व क्षेत्रात सारख्याच कार्यक्षमतेने काम करु शकतात. हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.
६. मुलींनी स्वत:ला कमी प्रतीचे समजू नये. कोणत्याही ठिकाणी केवळ मुलगी म्हणून अन्याय सहन करायचा नाही. अशी मनोभूमिका तयार करणे.
७. विद्यार्थ्यातील अंधश्रद्धा कमी करुन त्यांना विज्ञाननिष्ठा बनवणे.
८. क्षेत्रिय विचारसरणी देशाला विघातक आहे. हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.
९. आपण सारे एकाच देशाचे नागरिक आहोत या दृष्टीने निरनिराळ्या प्रांतातील

चालीरीतीबद्दल आदराची भावना रुजवणे.

१०. भाषावार प्रांतरचना ही राज्यकारभाराच्या सोईसाठी आहे. हे विद्यार्थ्यांना पटवून देणे.

११. गरीब-श्रीमंत या मानवनिर्मित भेदभावाची तीव्रता कमी करून गरिबांची आर्थिक परिस्थीती सुधारण्यास मदत करण्याची आवश्यकता आहे.

१२. भारतीय राज्यघटनेतील तत्वाच्या आधारे सर्व क्षेत्रात विशेषता ग्रामीण व शहरी जनतेत समानता आणण्याची आवश्यकता विद्यार्थ्यांना पटवणे.

१३. आपल्या जवळपास कोणी निरक्षर राहू नये असा प्रयत्न करण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

१४. कोणतेही काम कमी प्रतीचे नाही, सर्व व्यवसाय सारख्याच महत्वाचे आहेत. हे विद्यार्थ्यांना पटवून देणे.

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात एका विशिष्ट समाजरचनेची आवश्यकता प्रकार्षाने भासली. तो समाज म्हणजे एकसंघ, एकात्म, एकजीव समाज आणि सुसंघटित समाज ज्यात भेदभावाला थारा नाही, असे त्याचे वर्णन करता येईल.

अशा एकसंघ भारताच्या निर्मितीसाठीच हे गाभा मूल्य अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केले गेले आहे. सामाजिक अडथळे दूर करण्याच्या दृष्टीने जे संस्कार करणे आवश्यक आहे. ज्या वृत्तींचा परिपोष करावयाचा आहे, ते सर्व करण्यासाठी शाळेसारखी दुसरी प्रयोगशाळा व कृतिशाळा नाही. हे सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी प्राथमिक शाळेपासून मुलांची मनोभूमिका तयार करणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. बालपणचे संस्कार कायम स्वरुपी असल्यामुळे प्राथमिक शाळेपासूनच हे संस्कार होणे आवश्यक आहेत.

## ए : लहान कुटुंबाचा आदर्श

आज देशापुढील सर्वात मोठी समस्या कोणती असेल तर लोकसंख्या वाढ आपल्या देशामध्ये दर दीड सेकंदाला एक मूल जन्माला येते. इतक्या प्रचंड लोकसंख्यामुळे लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा मूलभूत गरजा सुद्धा पुऱ्या होत नाहीत लोकसंख्येच्या प्रचंड व अव्याहत होणाऱ्या वाढीमुळे घरांची टंचाई व गलिच्छ वस्त्या निर्माण होत आहेत. प्रचंडप्रमाणात झोपडपट्ट्यांची निर्मिती होत आहे. मोठमोठ्या शहरामधून पाणीपुरवठा खूपच कमी पडतो आहे. वृक्षतोड, बेकारी, अराजकता, गुन्हेगारी, महागाई हुंडाबळी, आत्महत्या अशा अनेक समस्यांचे मूळ ही लोकसंख्या वाढ आहे. यावर एकमेव उपाय म्हणजे लहान कुटंबाचा आदर्श विचारात घेणे.

सर्वसामान्यपणे 'कुटुंब' या व्याख्येत पती-पत्नी व त्यांची मुले या घटकांचा समावेश होतो. लहान कुटुंब म्हणजे पती-पत्नी व त्यांचे एकच अपत्य.

अनेक समस्यांची मूळ असलेली लोकसंख्या वाढ जर रोखायची असेल तर त्यावरील प्रभावी उपाययोजना म्हणजे लहान कुटुंबाचा आदर्श सर्वांनी डोळ्यासमोर ठेवणे. या गाभामूल्याचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊनच अभ्यासक्रमामध्ये याचा समावेश गाभाभूत घटकामध्ये करण्यात आलेला आहे.

### प्रस्तुत गाभा घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. लहान कुटुंबाची संकल्पना स्पष्ट करणे.
२. लहान कुटुंबाचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे ठेवणे.
३. लहान कुटुंबाचे फायदे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.

४. अनेक समस्यांचे मूळ लोकसंख्या वाढ आहे हे समजावून देणे.

५. कुटुंब लहान असेल तर खर्च कमी होतो. त्यामुळे सुखी व स्वस्थ जीवन जगता येते हे पटवून देणे.

६. लहान कुटुंबामुळे कुटुंबातील व्यक्तिंचा राहणीमानाचा व जीवनमानाचा दर्जा उंचावतो हे पटवून देणे.

७. लहान कुटुंबामुळे मुलांचे आरोग्य चांगले राहू शकते हे समजावून देणे.

८. कुटुंब लहान झाले की देशाची लोकसंख्या मर्यादित होत. परिणामी लोकसंख्येची गुणवत्ता वाढते व देशाची प्रगती होते हे समजावून देणे.

लहान कुटुंबाची योजना चांगली असली तरी तिची अंमलबजावणी करणे कठीण आहे. विद्यार्थ्यांच्या मनात लहानपणापासूनच लहान कुटुंबाविषयी आकर्षण निर्माण झाले, तर ते विद्यार्थी जेव्हा मोठे होतील तेंव्हा लहान कुटुंबाचा आग्रह धरतील, या दूरदृष्टीकोनातूनच या गाभा मूल्याचा समावेश अभ्यासक्रमातील गाभाभूत घटकामध्ये केलेला आहे.

## ऐ : वैज्ञानिक मनोभावची रुजवणूक

एखादी गोष्ट किंवा घटना अभ्यासताना तिचा कार्यकारणभाव जाणून घेऊन, प्रयोगांच्या किंवा पुराव्यांच्या साहाय्याने ती स्पष्ट करुन निष्कर्ष काढणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन होय.

निसर्गात एखादी घटना घडली, की त्याची कारणमीमांसा करायची, अशी बुद्धी माणसाला पूर्वीपासूनच आहे. नैसर्गिक व भौतिक घटनांमागील कारणांचा शिस्तबद्धरीत्या शोध घेण्याचा व त्याचा अर्थ लावण्याचा विज्ञान प्रयत्न करते. म्हणूनच विज्ञान म्हणजे अर्थाचा शोध घेण्याचा प्रयत्न होय.

विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून ते सिद्ध करण्यासाठी काही प्रयोग करणे, प्रयोगाचे सूक्ष्म निरीक्षण करणे, वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार करणे, त्यातून निष्कर्ष काढणे, यास वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणतात.

दिवसेंदिवस व्यवहारात, जीवनात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग वाढतच आहे. रुग्णालये, अभियांत्रिकी, कृषी, क्रीडा इत्यादी क्षेत्रात आधुनिक उपकरणे, खते, कीटकनाशके औषधे इत्यांदींचा उपयोग केला जातो. या सर्वांचा उपयोग कसा करावा, तो फायदेशीर कसा ठरेल, वेळ कसा वाचेल इत्यादी बाबी समजावून घेण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. एखाद्या प्रदेशाची समाजाची, वास्तविक स्थिती समजून घेण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन साहाय्यभूत होऊ शकेल.

देशाच्या विकासाच्या मार्गातील अनेक अडथळयापैकी अज्ञान, अंधश्रद्धा, काही रूढी परंपरांची कठोर बंधने आहेत. या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक दृष्टिकोन सर्व पातळीवर रूजविणे आवश्यक आहे.

**प्रस्तूत गाभा घटकांची उद्दीष्टे खालील प्रमाणे आहेत**

१. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक पद्धतीने विचार करण्यास प्रवृत्त करणे.

२. उपलब्ध माहितीचा विचार करून आपल्या समस्या सोडवायला शिकविणे.

३. गतिमान व बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता असत्मसात करणे.

४. विज्ञान या विषयाबद्दल आवड निर्माण करणे.

५. सभोवतालच्या घटनांचे बारकाईने व अचूक निरिक्षण करून निरिक्षणांच्या प्रमाणित नोंदी करण्यास प्रवृत्त करणे.

वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दीष्टे आहे 'वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक' या गाभा मूल्याचे महत्व लक्षात घेउन अभ्यासक्रमातील दहा गाभाभूत घटकामध्ये याचा
समावेश करण्यात आला.

वैज्ञानिक विचार प्रकियेची मनाला लावून घेतलली शिस्त, त्या प्रकियेच्या परिणामकारकतेवरील दृढ विश्वास, निरंतर जिज्ञासा त्यानंतर प्रत्यक्ष कृती या सर्वांचा समावेश वैज्ञानिक मनोभावात अभिप्रत आहे ही मनाची वैशिष्टपूर्ण जडण-घडण आजच्या शिक्षणामधून होते का? वैज्ञानिक माहिती शिकतो, पण वैज्ञानिक विचार प्रकिया आत्मसात करतो का? वैज्ञानिक मनोभावाचा अंगीकार विध्यार्थ्यानी केलेला असतो का? यासाठी म्हणजेच वैज्ञानिक मनोभाव रुजविण्यासाठी हे गाभा मूल्य अतिशय महत्वाचे ठरते.

अभ्यासक्रमातील इतर जे नऊ गाभाभूत घटक आहेत त्यांच्या रुजवणूकीसाठि हे गाभामूल्य पूरक व पोषक ठरणार आहे. थोडक्यात वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक ही एक सर्वस्पर्शी संकलपना आहे.

## २.३ राष्ट्रीय उद्दिष्टे व गाभाभूत धटक

प्राथमिक शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करत असताना शिक्षणतज्ज्ञांनी सर्वांगीण विकासासाठी जी 'राष्ट्रीय उद्दिष्टे' डोळ्यासमोर ठेवली होती ती खालीलप्रमाणे.

१. भारताची विविधरंगी संस्कृती व तिचा वारसा यांची आदरपूर्वक जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.

२. विद्यार्थ्यात राष्ट्रियवृत्ती व राष्ट्राभिमान जोपासणे.



13451
A

३. विद्यार्थ्यात राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता जोपासणे.

४. निसर्ग, परिसर यांची जोपासना करणे व उर्जेची बचत करण्याची सवय लावणे.

५. देशातील वैज्ञानिक प्रगती व तंत्रज्ञानाचा विकास यांची ओळख करुन घेणे.

६. भारतीय घटनेबद्दल आदर व नागरिकांचे हक्क व कर्तव्ये याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात योग्य जाणीव निर्माण करणे.

७. लोकसंख्यावाढ, समाजिक व आर्थिक विषमता यातून निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव निर्माण करणे.

(प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - १९८८)

वरील सातही उद्दिष्टे पूर्णतया गाभा घटकांचीच उद्दिष्टे आहेत हे लक्षात येते. गाभा घटकांची ही मूल्ये साध्य करणे म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करणे व परिणामी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे होय.

गाभा घटकांच्या अनुरोधाने शिक्षण प्रक्रिया प्रभावी व परिणामकारक बनवायची असेल तर शिक्षकांना सर्व गाभाघटक परिचित असले पाहिजेत गाभा घटकांतर्गत मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर कशी बिंबवावीत हे शिक्षकास कळले पाहिजे.

२.४ पाठ्यपुस्तके व गाभा घटक :

पाठ्यपुस्तके म्हणजे अध्ययन-अध्यापनाचे महत्वाचे साधन होय. पाठयपुस्तके अभ्यासक्रमाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करतात. या दृष्टिकोनातून नवीन अभ्यासक्रमाच्या अध्यापन-अध्यापनासाठी पाठ्यपुस्तके अधिक उपयुक्त ठरावीत म्हणून अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने ११ शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी ४ शिफारशी गाभा घटकांच्या बाबतीत आहेत. त्या खालील प्रमाणे

१. पाठ्यपुस्तकातील विवेचन व भाषा कोणत्याही जाती, जमाती, पंथ, धर्म यांच्या भावना दुखावणारी नसावी.

२. प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकातील विवेचनात १० गाभा घटकांपैकी जास्तीतजास्त गाभा घटक साध्य होतील याकडे विशेष लक्ष दिले जावे.

३. सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरुष समानता व सामाजिक न्याय ही तत्त्वे कटाक्षाने पाळली जावीत.

४. भाषा, सामाजिक शास्त्रे, कार्यानुभव व कला शिक्षण या विषयांच्या पाठ्यपुस्तकामध्ये भारतीय संस्कृतीचा वारसा व राष्ट्रीय अस्मिता जोपासली जावी.

(प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८)

पाठ्यपुस्ताकासंबधी शिफरशी करतांना अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने गाभा घटकांना खूपच महत्व दिल्याचे दिसून येते.

२.५ समारोप :

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनेक वैशिष्टांपैकी एक वैशिष्ट्य असलेल्या १० गाभाभूत घटकांच्या संदर्भात गाभाभूत घटक म्हणचे काय ? प्रत्येक गाभाभूत घटकाचा आशय, उद्दिष्टे व महत्त्व यांच्या संदर्भात ऊहापोह केलेला आहे या संशोधनाची पार्श्वभूमी म्हणून या प्रकरणाचा उपयोग होणार आहे.

संशोधनाच्या प्रस्तुत पार्श्वभूमीचा परिचय करुन घेतल्यानंतर आपण संशोधनाच्या या विषयाशी निगडित असलेल्या साहित्याचा आढावा घेऊ. पुढील प्रकरणामधून ( प्रकरण क्रमांक ३ ) संशोधनाशी संबधित असलेल्या साहित्याचा आढावा घेऊ.